पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक २०

**सभावृत्तांत**

दिनांक - ०२/०४/२०१४ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०२/०४/२०१४ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. भारती फरांदे
२) मा. काळे विमल रमेश
३) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.उल्हास जगताप -नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने उपस्थित सन्मा. सदस्य यांनी बुधवार दिनांक १६/०४/२०१४ रोजी दुपारी ३.४५ पर्यंत सभा तहकूब केली.

सही/-
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिति

कार्यपत्रिका क्रमांक २०

**<u>सभावृत्तांत</u>**

( दिनांक ०२/०४/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - १६/०४/२०१४ वेळ - दुपारी ३.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची दिनांक ०२/०४/२०१४ ची तहकूब सभा बुधवार दिनांक १६/०४/२०१४ रोजी दुपारी ३.४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
२) मा. भारती फरांदे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने उपस्थित सन्मा. सदस्य यांनी बुधवार दिनांक ०७/०५/२०१४ रोजी दुपारी ३.४५ पर्यंत सभा तहकूब केली.

सही/-

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक २०

**<u>सभावृत्तांत</u>**

( दिनांक ०२/०४/२०१४ व १६/०४/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - ०७/०५/२०१४ वेळ - दुपारी ३.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची दिनांक १६/०४/२०१४ ची तहकूब सभा बुधवार दिनांक ०७/०५/२०१४ रोजी दुपारी ३.४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. बोकड रामदास गेणभाऊ – सभापती
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. भारती फरांदे
४) मा. प्रसाद शेट्टी

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक ०५/०२/२०१४, १५/०२/२०१४, २१/०२/२०१४, २५/०२/२०१४, २८/०२/२०१४, ०५/०३/२०१४ व १९/०३/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १७ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०५/०३/२०१४ व १९/०३/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १८ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक १९/०३/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १९ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ८४ विषय क्रमांक – १

दिनांक – ०७/०५/२०१४

सूचक – मा.भारती फरांदे अनुमोदक – मा. प्रसाद शेट्टी

संदर्भ – मा. वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

विषय - प्रभाग क्र.११ से.नं.२२ राजनगर मधील कै.मधुकरराव पवळे व्यायामशाळा जयभवानी तरूण मंडळास चालविण्यास देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८५ विषय क्रमांक – २

दिनांक – ०७/०५/२०१४ विभाग – क्रीडा विभाग

सूचक – मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा.भारती फरांदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.क्रीडा/३/कावि/१४/२०१४, दि.२५/०२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या २१ व्यायामशाळांकरीता सन्मा.नगरसदस्य यांनी व अग्निशमन विभागातील कर्मचा-यांचे व्यायामशाळांकरीता विविध प्रकारचे व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या र.रु.२०,१३,२९०/- ( अक्षरी र.रु.वीस लाख तेरा हजार दोनशे नव्वद फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता व सदर व्यायामशाळा साहित्य खरेदीची कार्यवाही मध्यवर्ती भांडार विभागाकडून ई निविदा नोटीस प्रसिध्द करुन कार्यवाही करणेस व सदरचे विषयास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८६ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०७/०५/२०१४ विभाग – क्रीडा विभाग

सूचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा. मंदाकिनी ठाकरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.क्रीडा/७अ/कावि/२०९/२०१४, दि.१०/०३/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जिल्हास्तर शालेय क्रीडास्पर्धा २०१३-१४ मधील ४७ खेळ प्रकारच्या स्पर्धांपैकी ४० खेळ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन म.न.पा. क्रीडा विभाग यांनी केल्याने उर्वरित ७ खेळ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन म.न.पा. परिसरातील ६ खाजगी शाळांकडे सोपविल्याने त्याकामी त्यांना प्रस्तावात नमुद प्रमाणे त्यांच्या नावापुढे नमूद केलेप्रमाणे एकूण र.रु.८०,४४०/- मंजूर करणेस व त्यांचेकडून प्राप्त झालेल्या देय खर्चाच्या बीलातील रक्कम व मंजूर रक्कम यातील जी रक्कम

कमी असेल ती रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( बोकड रामदास गेणभाऊ )
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ४०२ /२०१४
दिनांक – ०७ / ०५ /२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.